# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

## विद्यापीठाने निर्मिती केलेले सुधारित व संकरीत वाणाबद्दल सर्व समावेशक व सविस्तर माहिती

| अनु. क्र. | तपशिल | सविस्तर माहिती |
|---|---|---|
| १. | पीक/वाणाचे नाव | **रताळी – कोकण आश्विनी** |
| २. | प्रसारित केल्याचे वर्ष | २००० |
| ३. | प्रसारित करणारी संस्था/विद्यापीठ | डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली |
| ४. | जमीन | रताळी पीक विषुववृत्तीय व समशीतोष्ण कटिबंधात चांगले येते. तसेच खरीप व रब्बी या दोन्ही हंगामात घेता येते. या पिकास वार्षिक सरासरी ५०० मी. मी. पर्जन्यमान पुरेसे होते. जास्त पावसाच्या प्रदेशात या पिकाची लागवड करता येते मात्र चांगल्या निच-याची व्यवस्था करणे गरजेचे आहे. |
| ५. | हवामान | जमिनीबाबत हे पीक फार चोखंदळ नाही. वरकस, साधारण सुपीक ते मध्यम प्रकारची जमिनीत हे पीक चांगले येते. पाण्याची उत्तम निचरा होणारी जमीन निवडावी. चिकट, दलदलीची व पाण्याचा निचरा न होणारी जमिनीत लागवड करु नये. |
| ६. | पेरणी/लागवडीचा कालावधी | पावसाळी पिकाची लागवड जून महिन्याच्या दुस-या पंधरवाडयात पूर्ण करावी. ज्या ठिकाणी हमखास पाण्याची सोय आहे. अश्या ठिकाणी रब्बी हंगामात ऑक्टोबर ते नोव्हेंबर महिन्यात लागवड करावी. |
| ७. | प्रती एकर बियाणे | ३३, २०० वेलीचे तुकडे |
| ८. | पीक व्यवस्थापन | **१.लागवडीचे /पेरणीचे व्यवस्थापन :** लागवड हि वरंब्यावर २० सेंमी. अंतरावर करावी. प्रत्येक ठिकाणी एकच बेणे वापरावे. याप्रमाणे ६०X २० सेंमी. अंतरावर लागवड करावी. बेण्याचा मधला भाग समांतर जमिनीमध्ये पुरावा व दोन्ही टोके उघडी ठेवावीत. मधल्या भागावरील दोन डोळे मातीत गाडले जातील याची काहजी घ्यावी. वारम्ब्याची उंची २५ ते ३० सेंमी. असावी.<br>**२.खत व्यवस्थापन :** जमीन नांगरुन तयार केल्यानंतर सुरुवातीस हेक्टरी १० टन चांगले कुजलेले शेणखत अथवा कॉम्पोस्ट जमिनीमध्ये चांगले मिसळून घ्यावे. या पिकास रासायनिक खताची मात्रा नत्र स्फुरद पालाश अनुक्रमे ७५:५०:७५ किलो प्रति हेक्टर प्रमाणे द्यावीत. या खतांपैकी ५० टक्के नत्र व पालाश आणि संपूर्ण स्फुरदाची मात्रा लागवडीवेळी द्यावी तर उर्वरित नत्र व पालाशची मात्रा लागवडीनंतर ३० दिवसांनी आळी करुन द्यावीत व लगेच भर द्यावी.<br>**३.पाणी व्यवस्थापन :**<br>खरीप हंगामात लागवड केल्यास पाणी देण्याची आवश्यकता असते. |

| | | |
|---|---|---|
| | | रब्बी हंगामात उत्पादन घेण्यासाठी लागवड करण्यापूर्वी पाणी  द्यावे व वापसा अवस्थेत लागवड करावी. लागवडीनंतर लगेचच पाणी द्यावे. त्यानंतर जमिनीच्या मगदुराप्रमाणे १० ते १२ दिवसाच्या अंतराने पाणी द्यावे. शेतात पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी. |
| | | **४.किड व्यवस्थापन :** रताळी या पिकावर रताळयावरील सोंडया भुंगा, पाने खाणा-या अळया, पांढरी माशी, नाकतोडा व कोळी इत्यादी किडींपासून नुकसान होते. रताळीवरील सोंडया भुंगा हि कीड या पिकाची प्रमुख शत्रू मानली जाते. त्यामुळे रताळीवरील हेक्टरी उत्पन्न व प्रत यावर अनिष्ट परिणाम होतो. या किडींचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी पुढीलप्रमाणे एकात्मिक उपाययोजना कराव्यात.<br>१.  किडविरहीत बेणे लागवडीसाठी वापरावे.<br>२. लागवड करताना फोरेट १० टक्के दाणेदार हेक्टरी १० किलो या प्रमाणात जमिनीत चांगले मिसळावे.<br>३. बेणे लागवडीसाठी फेनित्रिथिओन किंवा मोनो क्रोटोफॉस ०.०५ टक्के द्रावणात १० मिनिठे बुडवून ठेवावीत.<br>४. कामगंध सापळा (एक सापळा प्रति गुंठा) शेतामध्ये ठेवावेत.<br>५. २ ओळी रताळी + एक ओळ झेंडू या प्रमाणात लागवड करावी. |
| | | **५. अंतरमशागत :** लागवड केल्यानंतर १५ दिवसांनी पहिली बेणणी मजुरांकडून करुन घ्यावी. तर दुसरी बेणणी लागवडीनंतर ३० ते ४० दिवसांनी तणांच्या तीव्रतेनुसार करावी. दुस-या बेणणीवेळी वेलींना रासायनिक खतांख हप्ता देऊन मातीची भर द्यावी. वेलींना जमिनीत टेकलेल्या ठिकाणी डोळयांमधून मुळे फुटतात. अशावेळी लागवडीनंतर ४५ ते ६० दिवसांनी वेल उचलून पुन्हा जमिनीवर ठेवावेत. |
| ९. | **पिकाचा कालावधी** | १०५ दिवस |
| १०. | **उत्पादकता** | १२  ते १५ टन प्रति हेक्टर |
| ११. | **वाणाची वैशिष्ट्ये/ विशेष गुणधर्म** | वेल निमपसरा, कंद लंबगोलाकार, साल गडद गुलाबी रंगाची, गर दुधाळ पांढ-या रंगाचा, चवीस गोड |
| १२. | **वाणासंबंधी छायाचित्रे** |  |

| अनु. क्र. | तपशिल | सविस्तर माहिती |
|---|---|---|
| १. | पीक/वाणाचे नाव | **कणगर – कोकण कांचन** |
| २. | प्रसारित केल्याचे वर्ष | २००० |
| ३. | प्रसारित करणारी संस्था/विद्यापीठ | डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली |
| ४. | जमीन | कणगर पिकासाठी पाण्याचा उत्तम निचरा होणारी भुसभुशीत, सेंद्रिय पदार्थ मुबलक असणारी मध्यम ते पोयटायुक्त जमीन निवडावी. भुसभुशीत आणि भरपूर संद्रिय पदार्थ असलेल्या जमिनीत या पिकाचे कंद गुळगुळीत पृष्ठभाग असलेले आणि मोठया आकाराचे पोसले जाताता. दलदलीच्या व कमी निच्र्याच्या जागेमध्ये या पिकाची लागवड करु नये. |
| ५. | हवामान | हे पीक विषुववृत्तीय प्रदेशात चांगले येते. अति पावसाच्या प्रदेशात, उष्ण व दमट हवामानात कंद चांगले पोसले जातात. चांगला विखरलेल्या प्रमाणात भरपूर पाऊस या पिकास चांगला समजला जातो. परंतु चांगल्या निच-याची व्यवस्था असणे गरजेचे आहे. या पिकास १५०० ते २००० मि. मी. वार्षिक सरासरी पावसाची आवश्यकता असते. सर्वसाधारण तापमान २५ ते ३५ डिग्री सें.ग्रे.असावे. |
| ६. | पेरणी/लागवडीचा कालावधी | खरीप – मे ते जून |
| ७. | प्रती एकर बियाणे | ७२० ते १०८० किलो |
| ८. | पीक व्यवस्थापन | **१.लागवडीचे /पेरणीचे व्यवस्थापन :** ज्या ठिकाणी पाणी देण्याची हमखास सोय असेल त्या ठिकाणी एप्रिल अखेर पर्यत किंवा ते महिन्यामध्ये करावी. सारी पध्दतीचा अवलंब केला असल्यास सरींमध्ये ६० सें. मी. अंतरावर कंद लावून मातीने झाकावेत किंवा खड्डा पध्दतीचा अवलंब केल्यास खड्डयामधील माती काढून त्यामध्ये बेण्याची लागवड करावी व मातीने झाकावेत. लागवडीसाठी ६० X ६० सें. मी. ची शिफारस केली आहे. लागवडीनंतर लगेच पाणी द्यावे. त्यानंतर पूस सुरु होईपर्यत आवश्यकतेनुसार ३ ते ४ दिवसांनी पाणी द्यावे. एप्रिल - मे मध्ये ज्यास शक्य नसेल त्या शेतक-यांनी पावसाच्या सुरुवातीस वरंब्यावर ६० सें.मी. अंतरावर कंदाची लागवड करावी. एक हेक्टर लागवडीसाठी १.८ ते २.७ टन बेणे कंदाची आवश्यकता असते. |
| | | **२.खत व्यवस्थापन :** वेलाची वाढ व कंदाचे पोषण चांगले होण्यासाठी भर खतांच्या जोडीला जोर खतांची आवश्यकता असते. कंद जमिनीत पोसण्याकरीता जमीन भुसभुशीत असणे आवश्यक आहे. त्यामुळे गवत, पालापाचोळा, शेणखत यासारख्या सेंद्रिय पदार्थावर जास्त भर द्यावा. किफायतशीर उत्पादनासाठी हेक्टरी ८०:६०:६० किलो नत्र स्फुरद पालाश |

| | | |
|---|---|---|
| | | या रासायनिक खतांचा वापर करावा त्यामध्ये ५० टक्के नत्र व पालाश आणि संपूर्ण स्फुरदशी मात्रा हि लागवडीवेळी द्यावी तर उर्वरित नत्र व पालाशची मात्रा लागवडीनंतर ३० ते ४० दिवसांनी आळे करुन द्यावी व लागलीच भर द्यावी. |
| | | **३.पाणी व्यवस्थापन :**<br>उत्पादन पूर्णतः कोरडवाहू अश्याप्रकारे घेतले जाते. त्यामुळे पावसाच्या पाण्यावरच उत्पादन घेण्यात येते. अतिरिक्त पाणी देण्याची आवश्यकता भासत नाहीस. मात्र पावसाळयात जर पावसाचा मोठा खंड पडला तर कृत्रिम पाण्याची व्यवस्था करणे गरजेचे आहे. |
| | | **४.पीक संरक्षण :** सर्वसाधारणपणे या पिकावर किडी व रोगांचा फारसा प्रादुर्भाव होत नाही. वाढीच्या वेळी पणे कुरतडणारी अळी य किडीचा व पानांवरील बुरशीजन्य रोगांस प्रादुर्भाव क्वचित प्रसंगी दिसून येतो या किडी व रोगांचा प्रादुर्भाव दिसताच मोनोक्रोटोफोस (३६ टक्के प्रवाही) १४ मी. ली. आणि कार्बेन्दाझीम १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यामध्ये मिसळून घेऊन वारा शांत असताना फवारावे. कांदावरही खवले किडींचा प्रादुर्भाव शेतामध्ये तसेच साठवणुकीत येतो. त्यांच्या नियंत्रणासाठी कंद लागवडीपूर्वी मोनोक्रोटोफॉस या किटकनाशकाच्या द्रावणामध्ये बुडवावेत व नंतर लागवड करावी. लागवडीवेळी खड्डयामध्ये निंबोळी पेंडीचा वापर करावा. |
| ९. | **पिकाचा कालावधी** | १९० -२१० दिवस |
| १०. | **उत्पादकता** | १८ ते १९ टन प्रति हेक्टर |
| ११. | **वाणाची वैशिष्ट्ये/ विशेष गुणधर्म** | कंद लंबगोलाकार व टोक गोलाकार, एकसारख्या आकाराचे, पिवळसर तपकिरी रंगाची साल व गर पांढ-या रंगाचा, कंद चवीस व शिजण्यास चांगले. |
| १२. | **वाणासंबंधी छायाचित्रे** |  |

| अनु. क्र. | तपशिल | सविस्तर माहिती |
|---|---|---|
| १. | पीक/वाणाचे नाव | **घोरकंद – कोकण घोरकंद** |
| २. | प्रसारित केल्याचे वर्ष | २००० |
| ३. | प्रसारित करणारी संस्था/विद्यापीठ | डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली |
| ४. | जमीन | उत्तम निचरा होणारी, खोल मध्यम, भुसभुशीत, पोयटयाची चांगली सुपीक जमीन या पिकाच्या वाढीसाठी उत्तम समजली जाते. काही जाती जमिनीत खोलवर उभ्या वाढत असतात. त्यामुळे मुबलक प्रमाणात सेंद्रीय पदार्थ जमिनीत खोलवर असणे आवश्यक आहे. तसेच जमीन खोल असणे आवश्यक आहे. सर्वसाधारणपणे आम्लयुक्त ते उदासीन जमीनी पिकास चांगल्या समजल्या जातात. |
| ५. | हवामान | घोरकंद हे पीक उष्ण कटिबंधात येणारे असल्याने या पिकास उष्ण व दमट हवामान आणि भरपूर सूर्यप्रकाशाची आवश्यकता असते. जास्त पावसाच्या प्रदेशात पीक चांगले येत असले तरी पावसाचे पाणी साठून राहणार नाही याची काळजी घ्यावी. |
| ६. | पेरणी/लागवडीचा कालावधी | पिकाची लागवड जुन महिन्याच्या सुरवातीस करावी. |
| ७. | प्रती एकर बियाणे | १२०० ते १४०० किलो |
| ८. | पीक व्यवस्थापन | **१.लागवडीचे /पेरणीचे व्यवस्थापन :** घोरकंदाची लागवड सरी वरंबा किंवा गादी वाफ्यावर केली जाते. सरी वरंब्यावर ९० ते ९० सेंमी. अंतरावर लागवड केली जाते. तर गाडी वाफ्यावर दोन झाडांमध्ये ९० सेंमी. अंतरावर लागवड केली जाते. लागवडीसाठी १ १ १ फुट आकाराचे खड्डे खोदावेत. त्यामध्ये मुबलक प्रमाणात शेणखत किंवा कंपोस्ट टाकावे. सर्वसाधारणपणे २५० ग्रॅम वजनाचा कंद किंवा कंदाचा तुकडा लागवडीसाठी वापरला जातो. कंदाची कुज होऊ नये यासाठी लागवडीपूर्वी बेणेप्रक्रिया करणे गरजेचे आहे. |
| | | **२.खत व्यवस्थापन :** घोरकंद पिकास सुपीक जमिनीची आवश्यकता असते. पुर्वमशागतीवेळी हेक्टरी १० ते १५ टन चांगले कुजलेले शेणखत अथवा कंपोस्ट खत जमिनीत चांगले मिसळून घ्यावे अथवा खड्डयामध्ये टाकावे. भरखातव्यतिरिक्त कोकण विभागासाठी हेक्टरी ८०:६०:८० किलो नत्र :स्फुरद :पालाश या खात मात्रेची शिफारस केली आहे. नत्र आणि पालाश खताची मात्रा दोन हप्त्यात विभागून द्यावी, तर स्फुरद खताची संपूर्ण मात्रा लागवडीच्या वेळी देण्यात यावी. |
| | | **३.पाणी व्यवस्थापन :**<br>घोरकंदाचे उत्पादन पूर्णतः कोरडवाहू अश्याप्रकारे घेतले जाते. त्यामुळे पावसाच्या पाण्यावरच उत्पादन घेण्यात येते. अतिरिक्त पाणी देण्याची आवश्यकता भासत नाही. मात्र पावसाळयात जर पावसाचा मोठा खंड |

| | | |
|---|---|---|
| | | पडला तर कृत्रिम पाण्याची व्यवस्था करणे गरजेचे आहे. |
| | | **४. अंतरमशागत :** आंतर्माशागातीमध्ये तन व्यवस्थापन, आच्छादन आणि वेलीला आधार देणे व भर देणे ३ गोष्टी  महत्वाच्या आहेत. लागवडीनंतर सुरुवातीच्या कालावधीत पीक मणमुक्त ठेवण्यात यावे. त्यासाठी २ वेळा मजुरांकडून बेणणी करावी. जमिनीतील ओलावा टिकून राहण्यासाठी आणि गवताचा प्रादुर्भाव कमी होण्यासाठी आच्छादन करणे गरजेचे आहे. या पिकाच्या वेलीची वाढ जोमदारपणे होते. त्यामुळे वेलीला नैसर्गिक किंवा कृत्रिम आधार देण्याची गरज असते. आधार देण्यासाठी बांबु, जी, आय, तार आणि प्लस्टिक सुतळीचा वापर करतात किंवा झाडांच्या सुक्या फांद्यांचा वापर केला जातो. लागवडी नंतर १५ दिवसाच्या आत वेलींना आधार द्यावा. खताची दुसरी मात्रा दिल्यानंतर पिकांस भर देण्याची गरज असते. |
| | | **५. पीक संरक्षण :** सर्वसाधारणपणे या पिकावर किडी व रोगांचा प्रादुर्भाव होत नाही. पानांवरील ठिपका हा रोग काही अंशी दिसून येतो. त्यांच्या नियंत्रणासाठी एकात्मिक रोग नियंत्रणाची उपाय योजना करावी. रोग विरहीत बेण्याचा वापर करावा, रोगाची लक्षणे दिसल्यानंतर लगेच डायथेन एम. – ४५ किंवा बाविस्टीन या बुरशी नाशकाची फवारणी करावी. |
| ९. | **पिकाचा कालावधी** | १८० दिवस |
| १०. | **उत्पादकता** | कंद उत्पन्न १५-१६  टन प्रती हेक्टर<br>वेलीलीवरील कंदिका ३ -३.५ टन प्रती हेक्टर |
| ११. | **वाणाची वैशिष्ट्ये/ विशेष गुणधर्म** | वेल सरळ वाढणारी व आधाराची गरज, कंद गोलाकार, साल तपकिरी रंगाची, गराचा रंग पांढराशुभ्र असून त्यावर गुलाबी रंगाची छटा, चवीस गोड |
| १२. | **वाणासंबंधी छायाचित्रे** |  |

| अनु. क्र. | तपशिल | सविस्तर माहिती |
| --- | --- | --- |
| १. | पीक/वाणाचे नाव | **वडीचा अळू – कोकण हरीतपर्णी** |
| २. | प्रसारित केल्याचे वर्ष | २००० |
| ३. | प्रसारित करणारी संस्था/विद्यापीठ | डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली |
| ४. | जमीन | पिकाच्या उत्तम वाढीसाठी खोल, चांगला निच-याची, सुपीक गाळाची पण भुसभुशीत व सेंद्रीय पदार्थानी समृध्द अशी जमीन निवडावी. जमिनीचा सामू उदासीन असावा. मात्र बारीक कणाच्या चिकन युक्त जमिनी पिकाय अयोग्य असते. |
| ५. | हवामान | उष्ण व दमट हवामान या पिकास चांगले मानवले. वार्षिक सरासरी १५०० ते २००० मिमी पाऊस या पिकास आवश्यक असते. पावसाचे वितरण हे सम व चांगल्या प्रमाणात असावे. जमिनीत सतत ओलावा असणे हे पीक वाढीच्या आणि अधिक उत्पादनाच्या दृष्टीने चांगले असते. आंतरपीक म्हणून वडीच्या अळूची लागवड करणे चांगले असते. |
| ६. | पेरणी/लागवडीचा कालावधी | खरीप – मे ते जुन |
| ७. | प्रती एकर बियाणे | २०० ते ३६० किलो |
| ८. | पीक व्यवस्थापन | **१.लागवडीचे /पेरणीचे व्यवस्थापन :** हंगामानुसार लागवड करण्यासाठी सरी वरंबा, सपाट वाफे किंवा गादी वाफा पध्दतीचा अवलंब करावा. कोणत्याही पध्दतीचा अवलंब केला तरी चालेल मात्र लागवडीकरीता चांगल्या निच-या बरोबर पुरेसा ओलावा जमिनीमध्ये टिकून राहील याची काळजी घ्यावी. लागवडीसाठी ९० X ९० सेंमी. अंतर राखावे. लागवड हि वर्षभर केंवाही करता येते. मात्र लागवड हि पावसाळयाच्या सुरुवातीस म्हणजे जूनमध्ये किंवा श्रावण महिना संपल्यानंतर केलेली चांगली असते. लागवडीसाठी मुख्य (मातृ) कंद किंवा कंदिकांचा वापर केला जातो. कंद किंवा कंदिका हया ८ ते १० सेंमी. खोलीवर लावाव्यात व मातीने चांगला झाकून घ्याव्यात. ९० X ९० सेंमी. वर लागवड केल्यास प्रति गुंठयास १२५ ते १३० कंद /कंदिकांची आवश्यकता असते. कंद लागवडीपूर्वी कंदास बीजप्रक्रिया करणे गरजेचे असते. ट्रायकोडर्मा या जैवीक बुरशीनाशकाची प्रक्रिया केल्यास चांगले असते. |
| | | **२.खत व्यवस्थापन :** जमिनीची पूर्व मशागत करतेवेळी हेक्टरी १० ते १५ टन भरखते जमिनीत मिसळून घ्यावीत. याव्यतिरिक्त रासायनिक खतांची मात्रा देण्याची आवश्यकता असते. किफायतशीर उत्पादनासाठी हेक्टरी ८०:६०:८० किलो नत्र स्फुरद पालाश या खात मात्रेची शिफारस केली आहे. यापैकी स्फुरद खताची संपूर्ण मात्रा लागवडीवेळी द्यावी मात्र नत्र व पालाश |

| | | |
|---|---|---|
| | | खते दोन वेळेस समान हप्त्यात विभागून द्यावीत. खताचा दुसरा हप्ता आळे पध्दतीने देऊन मातीने झाकून द्यावीत व पाणी द्यावे. |
| | | **३.पाणी व्यवस्थापन :**<br>पिकाचा कालावधी जास्त असतो तसेच पिकास पाण्याची जास्त आवश्यकता असते. पिकास सतत ओलावा राहील याकडे लक्ष द्यावे. ओलावा जेवढा जास्त तेवढया जास्त प्रमाणात पानांचे उत्पादन जास्त मिळते. पावसाळयात पिकास पाणी देण्याची आवश्यकता नसते. मात्र त्यानंतर जमिनीच्या मगदुराप्रमाने पाणी देण्याची व्यवस्था करावी. पाणी मुलाशी साठून राहणार नाही याचीही खबरदारी घ्यावी. पीक हे आंतरपीक म्हणून नारळ, सुपारी, चिकू, बागेत लावलेले असेल तर मुख पिकास पाणी देताना आपोआपच वाडीच्या अळू पिकास पाणी दिले जाते त्यामुळे स्वतंत्र व्यवस्था करण्याची गरज नाही. |
| | | **४. अंतरमशागत :** पिकाचे लागवडीवेळी दोन ओळी आणि दोन झाडांमधील अंतर जास्त असल्याने पिकाच्या सुरुवातीच्या अवस्थेत तणांशी स्पर्धा होऊ शकते. त्यासाठी सुरुवातीस लागवडीनंतर २० ते २५ दिवसांनी आणि ४० ते ४५ दिवसांनी हाती तण काढून पीक तणमुक्त ठेवावे. एकदा पिकाची वाढ झाली कि तणांचा प्रादुर्भाव कमी होतो. दुसरी बेणणी केल्यानंतर जोर खतांची दुसरी मात्रा देऊन पिकास भर द्यावी. रब्बी हंगामात जमिनीत ओलावा टिकून राहण्यासाठी आच्छादान करावे. |
| | | **५. पीक संरक्षण :** वडीचा अळू या पिकावर विशेष हानिकारक किडी किंवा रोग आढळून येत नाहीत. अपवादात्मक स्थितीत मुळकुज किंवा कंदकुज रोगाची लागण झालेली दिसते. या रोगाच्या नियंत्रणासाठी रोगमुक्त सशक्त मातृकंद लागवडीसाठी निवडावेत. तसेच जमिनीमध्ये बुन्ध्यांमध्ये पाणी साठून राहणार नाही याची काळजी घ्यावी. |
| ९. | पिकाचा कालावधी | १८० दिवस |
| १०. | उत्पादकता | कंद उत्पन्न १५-१६ टन प्रती हेक्टर<br>वेलीलीवरील कंदिका ३ -३.५ टन प्रती हेक्टर |
| ११. | वाणाची वैशिष्ट्ये/ विशेष गुणधर्म | वेल सरळ वाढणारी व आधाराची गरज, कंद गोलाकार, साल तपकिरी रंगाची, गराचा रंग पांढराशुभ्र असून त्यावर गुलाबी रंगाची छटा, चवीस गोड |
| १२. | वाणासंबंधी छायाचित्रे |  |

| अनु. क्र. | तपशिल | सविस्तर माहिती |
|---|---|---|
| १. | पीक/वाणाचे नाव | **करांदा – कोकण कालिका** |
| २. | प्रसारित केल्याचे वर्ष | २०१५ |
| ३. | प्रसारित करणारी संस्था/विद्यापीठ | डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली |
| ४. | जमीन | जमिनीच्या बाबतीत हे पीक फार चोखंदळ नाही. माळवरकस कमी ते साधारण सुपीक असलेल्या पण भरपूर सेंद्रिय पदार्थ असलेल्या जमिनी या पिकास पोषक समजल्या जातात. जमिनीचा सामू आम्लधर्मीय ते उदासीन असावा. करांदा पिकासाठी चांगल्या निचरा होणारी जमीन निवडावी. |
| ५. | हवामान | करांदा पिकास उष्ण व दमट हवामान चांगले मानवते. भरपूर व स्वच्छ सूर्यप्रकाशात पिकाची वाढ चांगली होते. वेलीवर करांदा तयार होण्याच्या वेळेस अति पाउस मात्र पिकास हानिकारक समजला जातो. |
| ६. | पेरणी/लागवडीचा कालावधी | खरीप – मे ते जुन |
| ७. | प्रती एकर बियाणे | १४० ते १६० किलो |
| ८. | पीक व्यवस्थापन | **१.लागवडीचे /पेरणीचे व्यवस्थापन :** लागवडीसाठी सर्व साधारणपणे ३० ते ५० ग्रॅम वजनाचे जमिनीवरील करांदे बियाणे म्हणून वापरले जातात. मोठया आकाराचे करांदे वापरल्यास वेलीची वाढ चांगली होते. परंतु ते विक्रीसाठी किंवा खाण्यासाठी वापरले जातात. करांदा पिकाची लागवड सरी वरंबा किंवा गादीवाफयावर केली जाते. लागवड करताना दोन झाडांमधील व दोन सरीमधील अंतर १ मीटर राखावे. लागवड करताना मोठया आकाराचा खड्डा खोदावा व त्यामध्ये ७-१० सें.मी. खोलीवर करांदाची लागवड करावी व वर मातीने झाकून घ्यावा. |
| | | **२.खत व्यवस्थापन :** करांदा पिकासाठी खत व्यवस्थापन अत्यंत महत्वाची आहे. जमिनीतील कंद पोसण्याच्या दृष्टीने लागवडी वेळी खड्डयामध्ये शेणखत टाकणे शक्य आहे. कारण या पिकासाठी लागवड अंतर जास्त आहे. त्यामुळे हेक्टरी फक्त १०,००० झाडेच बसतात. त्यामुळे पूर्व मशागतीवेळी संपूर्ण शेतामध्ये शेणखत मातीमध्ये मिसळून टाकल्यास प्रत्यक्ष जागेवरच मुळांना खात मिळू शकते, रासायनिक खताची हेक्टरी मात्रा ८०:६०:८० किलो नत्र :स्फुरद:पालाश अशी द्यावीत, यापैकी अर्धी नत्र आणि पालाशची व संपूर्ण स्फुरदाची मात्रा लागवडीपूर्वी मातीत मिसळून द्यावीत, तर उर्वरित नत्र आणि पालाशची मात्रा लागवडीनंतर ३० ते ४० दिवसांनी द्यावीत, वर खताची मात्रा देताना आळे पध्दतीने द्यावीत व मातीने झाकून घ्यावीत. पावसाळयात हे पीक घेत असल्याने खते देऊन झाल्यानंतर पाणी देण्याची आवश्यकता नसते. मात्र पावसाची तीव्रता लक्षात घेऊन योग्य वेळी खते देण्यात यावीत व नंतर मातीची भर द्यावी. |

| | | |
|---|---|---|
| | | **३.पाणी व्यवस्थापन :**<br>करंदा पीक उत्पादन पूर्णतः कोरडवाहू अश्याप्रकारे घेतले जाते. त्यामुळे पावसाच्या पाण्यावरच उत्पादन घेण्यात येते. अतिरिक्त पाणी देण्याची आवश्यकता भासत नाही. मात्र पावसाळयात जर पावसाचा मोठा खंड पडला तर कृत्रिम पाण्याची व्यवस्था करणे गरजेचे आहे. |
| | | **४. अंतरमशागत :** पिकाचा कालावधी कमी असल्याने पिकामध्ये सुरुवातीच्या कालावधीत तण राहणार नाही याची काळजी घ्यावी. लागवडीनंतर १५ ते २० दिवसांनी आणि पुन्हा ३५ ते ४० दिवसांनी पिकास पुन्हा एकदा मातीची भर द्यावी. पिकास आधार देण्याची आवश्यकता असते. आधारासाठी स्थानिक उपलब्ध झाडांच्या फांद्या किंवा बांबू, तार व प्लास्टिक सुतळेचा वापर करावा. वेलीची वाढ जोरात होत असल्याने त्यांना योग्य दिशा व वळण देण्याची गरज असते. |
| | | **५. पीक संरक्षण :** किडी व रोगांचा करांदा पिकावर फारसा प्रादुर्भाव होत नाही. किडींसाठी पोषक वातावरण असल्यास वेलीवर कंरादे तयार झाल्यानंतर फळे पोखरणा-या अळीचा प्रादुर्भाव दिसून येतो. त्यासाठी मोनोक्रोटोफोस किंवा कार्बोसल्फान किंवा रोगर यापैकी एक कीटकनाशाकाची एकवेळा फवारणी पुरेसी होते. |
| ९. | पिकाचा कालावधी | १२० दिवस |
| १०. | उत्पादकता | वेलीवरील कंदिका ५.३० टन प्रती हेक्टर |
| ११. | वाणाची वैशिष्ट्ये/ विशेष गुणधर्म | वेल सरळ वाढणारी व आधाराची गरज, अधिक विक्रीयोग्य बल्बिल्सचे उत्पादन, बल्बील्स एकसारखे व गोलाकार , सालीचा रंग काळा तर गराचा रंग पिवळसर, कंद चवीस व शिजण्यास चांगले. |
| १२. | वाणासंबंधी छायाचित्रे |  |